# इ.११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया २०१५-१६

## (पुणे व पिंपरी – चिंचवड महानगरपालिका क्षेत्र)

## प्रसिद्धी निवेदन (दिनांक ६/६/२०१५)

---

### महाराष्ट्र राज्य बोर्डा व्यतिरिक्त इतर बोर्डाच्या विद्यार्थ्यांसाठी

पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता ११ वी चे प्रवेश ऑनलाईन पध्दतीने देण्यात येणार आहेत. इ.११ वी ऑनलाईन प्रवेशाची अर्ज व माहिती पुस्तिका सर्व विद्यार्थ्यांना मिळालेली आहे. त्याप्रमाणे सर्व विद्यार्थ्यांनी ऑनलाईन प्रवेश अर्ज पार्ट १ (Aplication Form) भरलेला आहे.

माहिती पुस्तिकेत नमूद केल्याप्रमाणे सीबीएसई /आयसीएसई/आयबी/ आयजीएसई/एनआयओएस महाराष्ट्र राज्य बोर्डाव्यतिरिक्त बोर्डाच्या विद्यार्थ्यांसाठी खालील तीन मार्गदर्शन केंद्रे ठेवलेली आहेत.

१) मराठवाडा मित्र मंडळ कॉलेज, डेक्कन जिमखाना, पुणे

२) नेस वाडीया कॉलेज, पुणे १

३) जयहिंद कॉलेज, पिंपरी

या मार्गदर्शन केंद्रावरुन महाराष्ट्र बोर्डा व्यतिरिक्त इतर बोर्डाच्या विद्यार्थ्यांनी त्यांचे इ. ११ वी ऑनलाईन पध्दतीने भरलेले प्रवेश अर्ज व्हेरीफिकेशन करुन घ्यावयाचे आहे. त्या संदर्भात खालील महत्त्वाच्या सूचना देण्यात येत आहेत.

- महाराष्ट्र राज्य बोर्डा व्यतिरिक्त इतर बोर्डाच्या विद्यार्थ्यांनी इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश अर्ज भरताना निवडलेल्या मागदर्शन केंद्रावर जावून स्वतःचा इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश अर्ज प्रमाणित (व्हेरीफिकेशन) करुन घ्यावा.
- सीबीएसई व आयसीएसई च्या विद्यार्थ्यांनी श्रेणीचे मार्कस् रुपांतरण आपापल्या शाळेच्या मुख्याध्यापकांच्या सही व शिक्क्यानुसार केलेले असावे.

- पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्र अथवा महाराष्ट्र बाहेरील राज्यातील व परदेशातील सीबीएसई च्या विद्यार्थ्यांचे श्रेणीचे मार्कस् रुपांतर सी बी एस ई बोर्डाच्या **www.cbse.nic.in** हया वेबसाईटवर नमूद असलेल्या मुंबई येथील चार शाळांकडून करुन घ्यावे.
    - RN Podar School, St. Andrews Road, Santacruz (West), Mumbai, Maharashtra -400 054 **(022- 26494788/ 26491102/67111111)**
    - Apeejay School, Sector-15, Nerul, New Mumbai, Maharashtra - 400706 **(022 – 27700179/27703635)**
    - DAV Public School Plot No. 11, Sector 10, Airoli, New Mumbai, Maharashtra -460 708 **(022 – 27600658/27698568)**
    - DAV Public School, Plot No. 34, Sector 48, Nerul, Navi Mumbai, Maharashtra 400 706 **(022 – 27714017/27713543/27714016)**
- शासन पत्र क्र. एच.एस.सी/१७११/(२७३-११)/उमाशि-१/दि. १५.०६.२०११ नुसार सीबीएसई बोर्डाच्या ज्या विद्यार्थ्यांनी **सीबीएसई शाळेची परीक्षा** दिली आहे असे विद्यार्थी या ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेसाठी पात्र नाहीत.
- सी बी एस ई व आय सी एस ई व्यतिरिक्त इतर बोर्डाच्या विद्यार्थ्यांनी त्यांचे श्रेणीचे मार्कस् रुपांतरण या कार्यालयाच्या अधिका-यांकडून करुन घ्यावे. **(शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे १ पत्ता : डॉ. आंबेडकर रोड, कॅम्प पुणे ४११००१)**

Raut
6.6.15

(मीनाक्षी राऊत)
**प्र.सहाय्यक शिक्षण संचालक,**
**पुणे विभाग, पुणे १**
**तथा सचिव**
**इ.११ वी ऑनलाईन प्रवेश प्रकिया पुणे**